वर्ष- १२ | अंक- १३ | मुंबई, मंगळवार,१० फेब्रुवारी २०२६ ते १६ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027
मूल्य २/- रुपये
PG|2
पोलीस बातमी पत्र
पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA
संपादक : दिपक मोरेश्वर नाईक
खूप प्रयत्न करूनही येत नाही शांत झोप

3 → चोरीचा मामला
लाडकी बहीण योजनेत मोठा घोटाळा सरकारी यंत्रणा हादरली ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

इजिप्त (कैरोच्या)भूमीत घुमला ठाण्याचा मानबिंदू; 'लोकमत वन वर्ल्ड' पुरस्काराने सन्मानित!









कैरो, इजिप्त (६ फेब्रुवारी २०२६):

प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभलेल्या इजिप्तची राजधानी कैरो येथे आज पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात ठाणे जिल्ह्याचे नाव जागतिक स्तरावर चमकले. साहित्य आणि शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कायार्साठी दिला जाणारा मानाचा 'लोकमत वन वर्ल्ड' पुरस्कार आज मला प्रदान करण्यात आला. या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर ठाणे जिल्ह्यातून झालेली ही निवड राज्याच्या शैक्षणिक, साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रासाठी भूषणावह ठरली आहे.

हा सोहळा केवळ एक गौरव सोहळा नसून, भारत आणि इजिप्त यांच्यातील दृढ होत चाललेल्या सांस्कृतिक संबंधांचे प्रतीक ठरला. नाईल नदीच्या काठी वसलेल्या या ऐतिहासिक शहरात भारतीय गुणवत्तेचा सन्मान होणे, हे दोन्ही देशांमधील वैचारिक आणि शैक्षणिक देवाणघेवाणीला नवी दिशा देणारे आहे. भारत आणि इजिप्तमधील ऐतिहासिक मैत्रीचे प्रतिबिंब या 'वन वर्ल्ड' संकल्पनेत उमटलेले पाहायला मिळाले.

लोकमत समूहाचे अध्यक्ष डॉ. विजय दर्डा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या सोहळ्याला भारतीय उद्योग,कला, साहित्य, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील दिग्गज उपस्थित होते. प्रसिद्ध अभिनेते बोमन इराणी, श्रीमती अमृता फडणवीस, अभिनेत्री सौंदर्य शर्मा यांसारख्या मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

पुरस्कार स्वीकारताना भावना व्यक्त करताना ते म्हणाले, ₹हा पुरस्कार मी पद्मश्री मधु मंगेश कर्णिक आणि माज्या सर्व हितचिंतकांना अर्पण करतो. माज्या आई-वडिलांनी आणि कुटुंबाने दिलेल्या प्रोत्साहनामुळेच मी समाजासाठी खारीचा वाटा उचलू शकलो.₹

इजिप्तसारख्या भव्य दिव्य शहरात हा सन्मान मिळणे हे मी माझे भाग्य समजतो अशी प्रतिक्रिया डॉ. प्रा प्रदीप ढवळे यांनी दिली . माज्या कायार्ची दखल घेतल्याबद्दल लोकमत समूहाचे मी मनापासून आभार मानले.₹

साहित्यिक मूल्ये जपण्यासोबतच शैक्षणिक संस्थांच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या योगदानामुळे ही निवड करण्यात आली आहे.

इजिप्तच्या या भूमीत भारतीय कर्तृत्वाचा झेंडा फडकल्याने ठाणे जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

बेलकडी (कामण) जंगल परिसरातील दोन अवैध गावठी दारू भट्ट्यांवर छापा; ३.६७ लाखांचा मुद्देमाल नष्ट

नायगाव - बेलकडी (कामण) जंगल परीसरातील दोन वेगवेगळया अवैध गावठी दारु भट्ट्यांवर छापा मारुन ३,६७,७००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल नष्ट केला. नायगाव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी. अधिकमाहितीनुसार नायगाव पोलीस ठाण्याच्या अधिकार क्षेत्रातील कामण येथील बेलकडी जंगल परीसरात राजेश हडळ हा अवैधरीत्या दारु निर्मितीची भट्टी लावत असल्याची माहीती प्राप्त झाल्याने या माहीतीच्या आधारे नायगाव पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक २५/०१/२०२६ रोजी मौजे बेलकड़ी जंगल परीसरात छापा मारुन गावठी दारु बनविणाऱ्या ०१ भट्टी उध्वस्त करण्यात आली असुन नमुद छापा कारवाई दरम्यान अंदाजे ३०० लीटर गावठी तयार दारु, व इतर साहित्य असा एकुण मिळुन १,६४,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तो जागीच नाश करण्यात आला. आरोपी इसमाविरुध्द नायगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्या नंतर काही वेळाने बातमीदाराने माहिती दिली कि सदर परिसरात चंद्रकांत खरपुडे व संतोष मलावकर काष्टीच्या नाल्यावरती अवैधरीत्या दारु निर्मितीची भट्टी लावत आहे . त्यानुसार नायगाव पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक २५/०१/२०२६ रोजी मौजे बेलकडी जंगल परीसरात छापा मारुन गावठी दारु बनविणाऱ्या ०१ भट्टी उध्वस्त करण्यात आली असुन नमुद छापा कारवाई दरम्यान अंदाजे २५० लिटर गावठी हातभट्टी दारु, व इतर साहित्य असा एकुण मिळुन २,०३,७००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तो जागीच नाश करण्यात आला. आरोपी इसमाविरुध्द नायगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अशा दोन्ही कारवाईमध्ये ३,६७,७००/- रुपये अवैध गावठी दारु भट्ट्यांवरील किंमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला आहे.सदरची कामगिरी मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त, मा. श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ २ वसई, श्री नवनाथ घोगरे, सहायक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय हजारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. विजय कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि/गणेश केकान, पोउपनिरी/ ज्ञानेश्वर आसबे, पोहवा/शेखर पवार, सचिन ओलेकर, सचिन मोहीते, पो. अंम/चेतन ठाकरे, सचिन खंताळ, अमर पवार, अशोक पाटील, पांडुरंग महाले सर्व नेमुणक नायगाव पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

वाहतूक सुरक्षा नियमांबाबत जनजागृती : रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत मार्गदर्शन सत्र

वसई- रस्ता सुरक्षा अभियान २०२६ च्या अनुषंगाने वाहतुक सुरक्षा नियम कायदे याबाबत मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. अधिकमाहितीनुसार रस्ता सुरक्षा अभियान २०२६ च्या अनुषंगाने वसई विकासिनी कॉलेज ऑफ व्हिज्युअल आर्ट वसई पु. येथे वाहतुक नियंत्रण शाखा वसई यांचे तर्फे दिनांक २७/०१/२०२६ रोजी रस्ता सुरक्षा सप्ताह २०२६ च्या अनुषंगाने वाहतुक सुरक्षा नियम कायदे या बाबत मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले.सदर कार्यक्रमाची प्रस्तावना सौ. वर्षा गावडे विभाग प्रमुख यांनी केली. डॉ. रिता सावला, राधे फाउंडेशनचे प्रमुख यांनी १०८/१२२ सेवेवर मोफत रुग्णवाहिका साठी कॉल करणे अपघाताची संपुर्ण माहीती देणे, रुग्णवाहिका चालकाने केलेल्या सर्व कॉलला उत्तर देणे, जेणे करुन रुग्णवाहिका अपघाताचे ठिकाणी लवकर पोहोचेल व रुग्णाला हॉस्पिटल मध्ये लवकरात लवकर पोहोचवता येईल. या बाबत मार्गदर्शन केले.

पोनि/सुजतिकुमार गुंजकर उपस्थितांना मार्गदर्शन करतांना रस्ता अपघाताच्या कारणांबाबत माहिती दिली, तसेच रस्ता अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबतही मार्गदर्शन केले व हेल्मेट परिधान करण्याचे महत्त्व सविस्तर पटवून दिले, विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम पाळण्याकरीता आवाहन केले.

सदर कार्यक्रमास श्री. विजय वर्तक (सेक्रेटरी) श्री. दत्तात्रेय ठोंबरे (प्राचार्य) प्रविण शिंदे (सहा. अधिव्याख्याता) सौ. वर्षा गावडे (विभाग प्रमुख) पोनि/ सुजितकुमार गुंजकर पोउपनि/मेहबुब तडवी श्रेणी पोउपनिरी/ प्रभाकर पाटील पोहवा / लालासो बावदाणे मपोशि/काजल पाटील असे उपस्थित राहीले. कार्यक्रमामध्ये एकुण २०० ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी, ४० प्राध्यापक / शिक्षक व सहायक कर्मचारी सहभागी झाले होते.तसेच विद्यार्थ्यांनी हेल्मेट बाबतचे सेल्फी कट आउट मध्ये फोटो काढून हेल्मेट परिधान करण्याकरीता प्रचार व प्रसार करण्याचा निश्चय केला.

त्यानंतर महाराष्ट्र रस्ता सुरक्षा सप्ताह २०२६ च्या अनुषंगाने मार्गदर्शन सत्र या कार्यक्रमाचा समारोप कार्यक्रम संपविण्यात आला.

पार्किंग चार्जेसवरून हुतात्मा स्मारकाजवळ बेधडक लूट, दोघांना अटक... विनाशुल्क पार्किंगसाठी प्रतितास रु.५०० वसुली

■मुंबई। प्रतिनिधी,

वलाईकर दुपारी साडेबारा वाजता गस्तीवर असताना हुतात्मा चौकात पोहोचले. तेव्हा काही तरुण पार्किंगच्या नावाखाली खासगी वाहनांकडून पार्किंगसाठी उघडपणे पैसे घेताना दिसले. त्यांनी चौकशी केली असता त्यांच्याकडून ह्यवेल टॅग्जह्न असे लेबल असलेल्या पावत्या जप्त करण्यात आल्या. गंभीर बाब म्हणजे त्यांचा बीएमसी किंवा कोणत्याही अधिकृत एजन्सीशी कोणताही संबंध नसल्याचे आढळून आले. याबाबत वलाईकर यांनी अधिक चौकशी करूनही त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले नाही. त्याचवेळी दोन वाहनमालकांनी पुढे येत पार्किंगसाठी प्रति तास दीडशे रुपये आकारल्याचे सांगितले. तर इतर वाहनमालकांनी चारचाकी वाहनांना प्रति तास ५०० रुपयांपर्यंत शुल्क आकारले जात असलाचा आरोप केला.



दक्षिण मुंबईतील हुतात्मा चौकसारख्या वर्दळीच्या परिसरात बेकायदेशीर पार्किंगसाठी कारमालकांकडून प्रति तास तब्बल ५०० रुपये वसुल केले जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे येथे पार्किंग विनाशुल्क असूनही मुंबई महापालिकेच्या नावाने वसुली केली जात आहे. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून ए वॉर्डमधील लिपिक जितेंद्र रामचंद्र वलाईकर (५२) यांनी एमआरए मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. ही घटना ३१ जानेवारी रोजी घडली.

मुंबई महापालिकेचे रस्ते दुरुस्ती विभाग, ए वॉर्डमधील लिपिक जितेंद्र रामचंद्र वलाईकर ३१ जानेवारी रोजी ए वॉर्ड परिसरात गस्त घालत होते. हुतात्मा चौक ते डीएन रोड दरम्यानच्या परिसरात पार्किंग केले जात आहे का, फोर्ट परिसरातील पार्किंग व्यवस्था नियमांनुसार आहे का, पार्किंग कर्मचाऱ्यांकडे अधिकृत ओळखपत्रे आणि निर्धारित ड्रेस कोड आहे का आणि बेकायदेशीर पार्किंग शुल्क वसूल केले जात आहे का, याची चौकशी करण्याचे निर्देश त्यांना देण्यात आले होते.

प्रकरणाचे गांभीर्य ओळखून वलाईकरांनी घटनास्थळी उपस्थित दोन्ही तरुणांना तत्काळ ताब्यात घेतले आणि त्यांना एमआरए मार्ग पोलीस ठाण्याकडे सोपवले. अटक केलेल्या आरोपींची नावे अमित मनोज सोनी (१८) आणि क्रिश कौशल किशोर गुप्ता (१८) अशी आहेत. बीएमसीने दाखल केलेल्या तक्रारीत स्पष्टपणे म्हटले आहे की, आरोपींनी सार्वजनिक पार्किंग जागा खासगी असल्याचे सांगून बेकायदेशीरपणे शुल्क वसूल केले.

ही महापालिकेची आणि मुंबईकरांची फसवणूक आहे. या तक्रारीच्या आधारे, पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांची चौकशी सुरू केली आहे. तसेच या बेकायदेशीर वसुलीमागे संघटित टोळी कार्यरत आहे का, याचाही शोध पोलीस घेत आहेत.

सुरक्षारक्षकानेच मारला डल्ला

मलबार हिलमध्ये १७ लाखांचा ऐवज लंपास

■मुंबई।प्रतिनिधी,

मुंबईतील सर्वात उच्चभ्रू आणि प्रतिष्ठित मलबार हिल भागातील एक खळबळजनक चोरीची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात कुंपणानेच शेत खाल्ले म्हणजेच सुरक्षारक्षकच चोर बनला. 'कल्पवृक्ष' या हाय प्रोफाइल निवासी इमारतीत तैनात असलेल्या एका सुरक्षारक्षकाने विश्वास तोडला आणि सुमारे १७ लाख रुपयांच्या मौलव्याव वस्तूंची बॅग घेऊन पळ काढला.

संपूर्ण घटना २८ जानेवारी रोजी सुरू झाली. इमारतीत राहणारे अशोक गजरा यांच्या कुटुंबाने सांताक्रूझला काही मौल्यवान वस्तू पाठवण्याची तयारी केली. अशोक गजरा यांच्या पत्नी सरोजबेन यांनी त्यांचा भाऊ हरेश सांजाकिया यांच्या घरी पाठवण्यासाठी सहा बॅगा तयार केल्या होत्या.

तथापि, त्याच्या व्यग्र वेळापत्रकामुळे, हरेश त्या दिवशी बॅगा उचलू शकले नाहीत आणि दुसऱ्या दिवशी ते स्वतः येऊन त्या घेऊन जातील, असे ठरले होते. सुरक्षेच्या कारणास्तव, या सर्व बॅगा तात्पुरत्या स्वरूपात सफाई कर्मचारी पन्नालाल यांच्या खोलीत ठेवण्यात आल्या होत्या. पण कुणालाही किंचितही संशय आला नाही की, शेजारी बसलेला सुरक्षारक्षक रामदेव सिंग याचे पन्नालालच्या घरात ठेवलेल्या बॅगवर लक्ष होते.

दुसऱ्या दिवशी, २९ जानेवारी रोजी, जेव्हा हरेश सांजाकिया दुपारी त्याचे सामान घेण्यासाठी आले तेव्हा त्याच्या गाडीत पाच बॅगा ठेवल्या होत्या. इमारतीतील कोणीतरी सहाव्या बॅगेबद्दल विचारले तेव्हा ती बॅग सुरक्षारक्षक रामदेव सिंगच्या खोलीत असल्याचे सांगण्यात आले. रामदेव सिंग जेवायला गेला होता. हरेश यांना सांगण्यात आले की, रामदेव सिंग परत आल्यावर बॅग त्यांच्या गाडीत ठेवेल. सुमारे दीड तास वाट पाहिल्यानंतरही रामदेव परतला नाही आणि त्याचा मोबाईल फोनही बंद होता, तेव्हा त्याच्यावर संशय येऊ लागला.

दोन दिवस आरोपी रामदेव सिंगचा पत्ता न लागल्याने, कुटुंबाने ३१ जानेवारी रोजी पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनी बॅगांबद्दल माहिती घेतली असता त्यात १२ लाख रुपये रोख आणि अंदाजे ५ लाख रुपयांची तीन मौल्यवान रोलेक्स घड्याळे असल्याचे कळले. आरोपीने एकूण १७ लाख रुपयांची चोरी झाल्याचे उघड झाले. मलबार हिल पोलिसांनी आरोपी रामदेव सिंगविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस पथक सीसीटीव्ही फुटेज तपासत आहे आणि त्याच्या मोबाइल लोकेशनवरून आरोपीचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहे.

रुजू होऊन आठवडाही झाला नाही अन् २६ वर्षीय निवासी डॉक्टरनं हॉटेलमध्ये संपवलं आयुष्य

■नागपूर। प्रतिनिधी,



तरुण डॉक्टरच्या आत्महत्येने वैद्यकीय वर्तुळात मोठी खळबळ

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (मेडिकल) एका तरुण निवासी डॉक्टरने सोमवारी सकाळी गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पदव्युत्तर शिक्षणाचे स्वप्न उराशी बाळगून नुकताच प्रवेश घेतलेल्या या २६ वर्षीय डॉक्टरच्या अकाली निधनाने वैद्यकीय क्षेत्रात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे. हा डॉक्टर नेत्ररोग विभागात कार्यरत होता. सोमवारी सकाळी शहरातील एका हॉटेलमध्ये त्याने टोकाचे पाऊल उचलले. ही घटना उघडकीस येताच सहकारी डॉक्टरांमध्ये आणि मेडिकल परिसरात शोककळा पसरली आहे. अभ्यासू आणि तरुण सहकाऱ्याच्या अशा अचानक जाण्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समोर आले नसून, गणेशपेठ पोलिसांनी या प्रकरणाची नोंद केली आहे. पोलीस सध्या विविध अंगांनी तपास करत असून लवकरच या घटनेचा उलगडा होण्याची शक्यता आहे.

शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (मेडिकल) एका २६ वर्षीय निवासी डॉक्टरने सोमवारी सकाळी एका हॉटेलमध्ये गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. या धक्कादायक घटनेमुळे नागपूरच्या वैद्यकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. मृत डॉक्टर हा नेत्ररोग विभागात कार्यरत होता आणि त्याने नुकताच पदव्युत्तर अभ्यासासाठी प्रवेश घेतला होता. सोमवारी सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात शोककळा पसरली आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही, मात्र एका तरुण आणि होतकरू डॉक्टरच्या अशा जाण्याने त्याच्या सहकारी डॉक्टरांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. गणेशपेठ पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून घटनेचा सखोल तपास सुरू केला आहे.

रुजू होऊन आठवडाही झाला नाही अन्न...

बुलढाणा येथील रहिवासी असलेले २६ वर्षीय तरुण निवासी डॉक्टर ऋत्विक सागर ठाकूर यांच्या आत्महत्येच्या वृत्ताने नागपूर मेडिकलसह वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. ऋत्विक यांनी मुंबईतील प्रसिद्ध के.ई.एम. रुग्णालयातून आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले होते. त्यांचे दोन्ही पालकही डॉक्टर असून, ऋत्विक यांनी नुकताच २७ जानेवारी २०२६ रोजी नागपूर मेडिकलच्या नेत्ररोग विभागात पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता. नेत्ररोग विभागाचे प्रमुख डॉ. दिलीप उमरे यांच्या युनिटमध्ये कार्यरत असलेले ऋत्विक सोमवारी हॉस्पिटलमध्ये गैरहजर होते. त्यामुळे डॉ. उमरे यांनी त्यांच्या वडिलांशी संपर्क साधला. वडिलांनी वारंवार फोन करूनही ऋत्विकने प्रतिसाद न दिल्याने संशय बळावला. अखेर त्यांनी ज्या हॉटेलमध्ये ऋत्विक थांबले होते, तिथल्या व्यवस्थापनाला माहिती दिली. हॉटेल कर्मचाऱ्यांच्या हाकेलाही प्रतिसाद न मिळाल्याने पोलिसांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला, तेव्हा ऋत्विक यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. घटनेची माहिती मिळताच गणेशपेठ पोलिसांनी घटनास्थळ गाठले. प्राथमिक तपासात कोणतीही सुसाईड नोट सापडलेली नाही. त्यामुळे अवघ्या काही दिवसांपूर्वीच प्रवेश घेतलेल्या या तरुण डॉक्टरने टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप गुलदस्त्यात आहे. पोलीस सध्या या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करत आहेत.

डॉक्टर पालकांचा एकुलता एक

आधार हरपला

बुलढाणा येथील मूळ रहिवासी आणि नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टर ऋत्विक सागर ठाकूर (२६) यांनी सोमवारी सकाळी एका हॉटेलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. विशेष म्हणजे, ऋत्विक यांनी केवळ ७ दिवसांपूर्वीच, म्हणजेच २७ जानेवारी २०२६ रोजी नेत्ररोग विभागात पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता. ऋत्विक यांचे दोन्ही पालक व्यवसायाने डॉक्टर असून, त्यांनी स्वतः मुंबईतील नामांकित के.ई.एम. रुग्णालयातून एमबीबीएस पूर्ण केले होते. उच्च शिक्षणासाठी ते नागपुरात डॉ. दिलीप उमरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत होते. सध्या कॉलेजच्या वसतिगृहात जागा मिळेपर्यंत ते गणेशपेठ बसस्थानकाजवळील एका हॉटेलमध्ये मुक्कासाला होते. सोमवारी ऋत्विक कर्तव्यावर हजर न झाल्याने विभागप्रमुख डॉ. उमरे यांनी त्यांच्या वडिलांशी संपर्क साधला. वडिलांनी केलेल्या वारंवार फोनला ऋत्विकने प्रतिसाद न दिल्याने संशय बळावला. अखेर हॉटेल व्यवस्थापनाच्या मदतीने आणि पोलिसांच्या उपस्थितीत रूमचा दरवाजा तोडला असता, ऋत्विक यांचा मृतदेह गळफास घोतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेमुळे संपूर्ण वैद्यकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली असून, गणेशपेठ पोलीस आत्महत्येच्या कारणांचा शोध



खूप प्रयत्न करूनही येत नाही शांत झोप





व्यायाम करणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशी ठरते. यामुळे आपलं शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी मदत होते. परंतु तुम्हाला माहीत आहे का? व्यायामाचा संबंध फक्त आपल्या शारीरिक आरोग्यावर नाही तर झोपेसोबतही असतो. असं आम्ही सांगत नसून काही दिवसांपूर्वी करण्यात आलेल्या संशोधनातून असं सिद्ध झाले आहे. एका नव्या संशोधनातून असा दाव करण्यात आला आहे की, जे तरूण फिजिकली ॲक्टिव्हिटीमध्ये सहभागी असतात. ते एक्सरसाइज न करणाऱ्यांच्या तुलनेत जास्त वेळ आणि उत्तम पद्धतीने झोप घेतात.

एक्सरसाइज केल्याने रात्री १० मिनिटं जास्त झोपतात

सायन्टिफिक रिपोर्ट्स नावाच्या जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या या संशोधनामध्ये संशोधनकर्त्यांना असं आढळून आलं की, अशा तरूण व्यक्ती ज्या प्रत्येक तासाला काही जास्त परिश्रमाची कामं करतात, ते रात्री १८ मिनिटं लवकर, १० मिनिटं जास्त आणि एक टक्के शांत झोप घेतात. पेन स्टेटच्या डेटा साइंटिस्ट लिंडसे मास्टर म्हणतात की, 'शांत झोप येणं हे तरूणपणी अत्यंत अवघड असतं. कारण या दरम्यान झोप क्लासरूम परफॉर्मन्स, स्ट्रेस आणि इटिंग बिहेवियरमुळे डिस्टर्ब असते. याच गोष्टींवर हा रिसर्च लक्ष केंद्रित करतो. जर तरूण मुलांना प्रत्येक दिवशी जास्त एक्सरसाइज करण्यासाठी प्रोत्साहित केलं गलं तर रात्री त्यांना शांत झोप मिळण्यासाठी मदत होते.

दिवसभरात आळस केल्याने रात्री झोप येत नाही

संशोधनातून सिद्ध झालेले सर्व निष्कर्ष दिवसभरात जर तरूण निष्क्रीय राहत असतीस तर रात्री त्यांना शांत झोप लागत नाही. संशोधनमध्ये सहभागी झालेले प्रतिस्पर्धी जेव्ह दिवसभरामध्ये जास्त वेळेसाठी निष्क्रिय असतात. ते रात्रीच्या वेळी लवकर जोपतात आणि सकाळी उशीरा उठतात. पण त्यांची झोप पूर्ण होत नाही. म्हणजेच फिजिकल ॲक्टिव्हीटी आणि झोपेमध्ये संबंध असल्याचे स्पष्ट होते.

वयाच्या १५ व्या वर्षी ४१७ लोकांना सहभागी करण्यात आलं होतं

संशोधनासाठी संशोधकांनी ४१७ लोकांना सहभागी केलं होतं. जेव्हा या व्यक्ती १५ वर्षांच्या होत्या, त्यावेळी त्यांना एक्सीलेरोमीटर्स देण्यात आले होते. जे त्यांच्या मनगटावर आणि हिप्सवर बांधण्यात आले होते. जे एक आठवड्यापर्यंत त्यांची फिजिकल ॲक्टिव्हीटी आणि झोप यांच्यावर लक्ष ठेवण्याचे काम करत होते. या संशोधनाचा उद्देश हाच होता की, सहभागी झालेल्या लोकांकडून त्यांच्या वागणूकीबाबत विचारण्याऐवजी त्यांच्या शारीरिक हालचालिंब आणि झोपेवर लक्ष ठेवणे.

टिप : वरील सर्व गोष्टी संशोधनातून सिद्ध झालेल्या असून आम्ही केवळ माहिती म्हणून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत. यातून आम्ही कोणताही दावा करत नाही. त्यामुळे





नेहमी वाईट नसतं वाढतं वय, असतात काही खास फायदेही !

वाढदिवसाला अनेकजण गमतीने म्हणतात की, आयुष्यातील एक वर्ष कमी झालं. मित्रही गमतीने 'अरे म्हातारा होतोय तू' अशा कमेंट करू लागतात. अनेकांना असा अनुभव आला असेल. सामान्यपणे आपण बघतो की, वाढत्या वयामुळे अनेकजण निराश होऊ लागतात. कारण वाढत्या वयाकडे लोक म्हातारणाशी जोडून बघतात. त्यामुळे कुणी जर वय विचारलं तर अनेकजण वय लपवण्याचा प्रयत्न करतात. पण मुळात वय वाढणं तुमच्या आरोग्यासाठीच नाही तर सौंदर्यासाठीही फार फायदेशीर असतं. तज्ञांनुसार तर याचा संबंध मेंदूच्या क्षमतेशी सुद्धा असतो.

- **आत्मविश्वास वाढतो :** वाढत्या वयासोबतच अनेक गोष्टी इम्प्रूव्ह होतात. त्यातील एक मुख्य गोष्ट म्हणजे आत्मविश्वास वाढणे. अनेकांना कमी वयात वेगवेगळ्या गोष्टी करण्यात अडचणी, भीती वाटत असते, अनेकांना स्टेजवर जाण्याची भीती वाटत होती, तर कुणाला इंटरव्ह्यूचं टेन्शन आलं असेल. पण जसजसं वय वाढत जातं, तुमचा आत्मविश्वास वाढत जातो.
- **सौंदर्य सुद्धा खुलतं :** जसजसं वय वाढत जातं त्याचा सर्वांत जास्त प्रभाव त्वचेवर पडतो. वय वाढत असताना त्वचेवरील ऑईल दूर होत जासं आणि त्वचा ड्राय व चांगली होऊ लागते. वयानुसार, सेबेससियस ग्लॅंडमधून ऑइलचा स्त्राव कमी होतो. ज्यामुळे वाढत्या वयासोबत ऑइली त्वचेची समस्याही दूर होते.
- **स्मरणशक्ती :** जास्तीत जास्त लोकांची अशी धारणा असते की, वयानुसार मेंदूची क्षमता कमी होऊ लागते. पण इश्यू ऑफ सायकॉलॉजिकल सायन्सच्या एप्रिल २०१५ च्या रिसर्चनुसार, आपल्या कॉग्नीटिव्ह स्कील, ज्यात नाव, नवीन शब्द, माहिती लक्षात ठेवणे या क्षमता वयानुसार वाढत जाते. अभ्यासकांनुसार, विसरण्याची समस्या साठ वर्षांनंतर सुरू होते. हा रिसर्च ५० हजार लोकांच्या आयक्यू आणि मेमरी टेस्टवर केला होता. ज्यात लहान मुले, तरूण आणि वयोवृद्धांचा समावेश होता.
- **मायग्रेन होतो दूर :** वाढत्या वयासोबत मायग्रेनची समस्या ठीक होऊ लागते. यूनायटेड किंगडमच्या मायग्रेन ट्रस्टच्या मायग्रेन रिसर्च चॅरिटीनुसार, सर्वंच केसेसमध्ये असं होत नाही, पण ४० टक्के लोकांचं असं मत आहे की, त्यांच्या वाढत्या वयासोबत त्यांची समस्या दूर झाली.
- **कमी झोप येणे :** वय वाढण्याचा सर्वात मोठा फायदा हा असतो की, तुमच्याकडे काम करण्यासाठी जास्त वेळ असतो. कारण वय वाढण्यासोबत झोप कमी येते. खासकरून एका वयानंतर दिवसा झोप येतंच नाही. ज्यामुळे काम करण्यासाठी तुम्हाला अधिक वेळ मिळतो.

परिवार रक्षामंत्र

अरिहे सर्व रक्ष हँ फट् स्वाहा।

हा कुटुंबाचे संरक्षण करणारा मंत्र रोज सकाळी आणि सायंकाळी १ माळ जपून म्हटल्याने आलेले संकट दूर होते.

रोगनिवारक मंत्र

नमो विप्पोसही पत्ताणं नमो खेलो सहि पत्ताणं नमो जल्लो सहि पत्ताणं नमो सव्बो सहि पत्ताणं स्वाहा।

हा मंत्र म्हणत दररोज एक माळ जपल्याने सगळ्या प्रकारच्या रोगांपासून मुक्ती मिळते. आपले कष्ट कमी होतात.

द्रव्यप्राप्ती मंत्र

ह्री नमो अरिहंताणं सिद्धाणं आयरियाणं उवज्झायाणं साहूणं मम ऋद्धि-वृद्धी-समीहितं कुरू कुरू स्वाहा।

या मंत्राचे दररोज सकाळ, दुपार, सायंकाळी प्रत्येक वेळी ३२ वेळा मनातल्या मनात जप केल्याने सुख-समृद्धी, धनलाभ आणि कल्याण होते.

ह्री श्री कलिकुंड स्वामिने नमः।

या मंत्राचा सव्वा लाख जप केल्याने कठिणातील कठीण काम सिद्धीस जाते. गरिबी दूर होऊन लक्ष्मी प्राप्ती होते.

नमो भगवते श्री पार्श्वनाथाय क्षेमं कराय ह्री नमः।



या मंत्राचा जप केल्याने अचानक येणारे संकट आणि भीती दूर होते.

ह्री श्री हर-हर स्वाहा।

हा मंत्र दररोज १०८ वेळा जप केल्याने रोग, संकट आणि कोणत्याही प्रकारची चिंता दूर होते.

लिंबू पाणी पिण्याचे फायदे तितकेच तोटेही

जेव्हा आपल्याला एखाद्या गोष्टीचे फायदे जाणून घ्यायचे असतात तेव्हा आपण गुगलवर त्याची माहिती शोधतो. लिंबूसह पाणी हे एक पेय आहे ज्यामध्ये आरोग्यासाठी अनेक फायदे आहेत. मात्र, तितकेच त्याचे तोटेही आहेत.

लिंबू पाणी पिण्याचे फायदे

१.लिंबू विटमिन सी चे चांगले स्रोत आहे. या मध्ये इतर व्हिटॅमिन्स जसे की थायमिन, रायबोफ्लॅविन, नियासिन, व्हिटॅमिन बी-६ फोलेट आणि व्हिटॅमिन ई थोड्या प्रमाणात आढळतात. या मुळे घसा खराब होणे,बद्धकोष्ठता किडनी आणि हिरड्यांच्या समस्येपासून आराम देतो. रक्तदाब आणि तणाव देखील कमी करतो. त्वचा निरोगी बनविण्यासह लिव्हरसाठी देखील चांगले आहे.

२.पचन क्रिया संतुलित करण्यात आणि कर्करोगापासून बचाव करण्यासाठी हे मदत करते. या मध्ये अनेक प्रकारचे खनिजे जसे मॅग्नेशियम, फॉस्फरस, कॅल्शियम, पोटॅशियम आणि जिंक आढळते.

३.मूतखडा मध्ये देखील हे आरामदायक आहे. लिंबू पाणी प्यायल्याने शरीर रिहायड्रेट होण्यात मदत मिळते. हे युरीना पातळ करण्यात मदत करतो.

४.मधुमेह असल्यास किंवा वजन कमी करायचे असल्यास साखरेच्या पातळीला न वाढवता शरीराला रिहायड्रेट करून ऊर्जा देतो.



५.घसा खराब असल्यास कोमट पाण्यात लिंबू पिळून प्यायल्याने घसा बरा होतो.

६.वजन कमी करण्यासाठी दररोज मधासह कोमट पाणी प्यायल्याने जास्तीचे वजन कमी करू शकतो.

लिंबू पाण्याचे तोटे

पोट खराब होऊ शकते : लिंबू पोटासाठी खूप फायदेशीर असले तरी पाण्यात जास्त पिळून खाल्ल्याने पोटात गॅस्ट्रोएसोफेजल रिफ्लक्स डिसीज आणि ॲसिड रिफ्लक्स सारख्या समस्या उद्भवू शकतात. या दोन्ही समस्या लिंबासारख्या आम्लयुक्त अन्नापासून सुरू होतात. यामुळे छातीत जळजळ, मळमळ आणि उलट्या होऊ शकतात.

त्वचेसाठी हानिकारक : जर्नल ऑफ एन्व्हायर्नमेंटल हेल्थमध्ये २००७ च्या अभ्यासात, संशोधकांनी २१ वेगवेगळ्या रेस्टॉरंटमधील ७६ लिंबूंचे नमुने तपासले. यापैकी अनेक लिंबांच्या सालींवर असे अनेक सूक्ष्मजीव आढळून आले ज्यामुळे रोग होऊ शकतात. हे टाळण्यासाठी पाण्यात लिंबाची साल टाकण्याऐवजी त्याचे फक्त थेंब पाण्यात टाका.

जळजळ वाढवू शकते : लिंबू पाणी लहान जखमांमध्ये वेदना आणि जळजळ वाढवू शकते. किरकोळ जखमा एक किंवा दोन आठवड्यांत बऱ्या होतात. परंतु, अमेरिकन डेंटल असोसिएशनच्या मते, जास्त लिंबू पाणी प्यायल्याने कॅन्कर फोड वाढू शकतात. जास्त प्रमाणात लिंबूवर्गीय फळे खाल्ल्याने जखमा बऱ्या होण्यास विलंब होतो.

वजन कमी करण्यासाठी रोज प्या जिऱ्याचे पाणी

आजकाल धकाधकीच्या जीवनामुळे आणि खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे वजन वाढणं ही एक सामान्य समस्या बनली आहे. जास्त वजन आरोग्यासाठी हानिकारक ठरतं, यामुळे उच्च रक्तदाब आणि हृदयविकार यांसारख्या अनेक आरोग्य समस्या उद्भवतात. अशा परिस्थितीत वजन कमी करणं खूप गरजेचं आहे. वजन कमी करण्याचा एक नैसर्गिक आणि प्रभावी मार्ग म्हणजे दररोज जिरे पाणी पिणं. ते घरीही सहज बनवता येतं. जिऱ्यामध्ये अँटी-ऑक्सिडेंट्स आणि फायबर असतात जे वजन नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. जिरा पाण्यामुळे पचनकार्य सुधारतं आणि विषारी पदार्थ बाहेर टाकले जातात. आता हे जिरे पाणी नक्की बनवायचं कसं? तर पटकन वजन कमी करायचं असल्यास याच्या विविध पद्धती आहेत, यातील काही जाणून घेऊया.



१. साधं जिऱ्याचे पाणी
२. लिंबू जिरा पाणी
३. आलं-जिरा पाणी
४. दही आणि जिरा पाणी
५. गूळ आणि जिरे पाणी
६. मेथीचे दाणे आणि जिरे पाणी

वसई विरार शहर महानगरपालिका

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

समिती (H), विभागीय कार्यालय,
नवघर माणिकपूर
एस.टी. डेपोजवळ, वसई रोड (प),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ २०२.

दुरध्वनी : ०२५०-२३३४२५८/२३३४३५४
Email : amch.vvmc@gov.com
जा.क्र. व.वि.श.म./क.वि./एच/७२७५/२०२५-२६
दिनांक : ०४/०२/२०२६

जाहीर नोटीस

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ ला अधिन राहुन या नोटीसीद्वारे वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, खालील नमुद मिळकत धारकांनी मालमत्ता हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत / तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून सात (७) दिवसांच्या आत लेखी हरकत / तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी सदर हरकत / तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

अ.क्र.	विभाग	मालमत्ता क्र.	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणा-या किंवा करदात्याचे नाव	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	माणिकपूर २/१	VN19/35236	सरितादेवी नवरतन सेठिया	सुबोध कुमार जैन व वंदना सुबोध जैन
२	उमेळमान	VN01/61871/4	मायकल थामस करवालो व इतर १	अमित अशोक चटर्जी
३	माणिकपूर १/१	VN15/33378	किशोर रमणीकलाल भिमानी	वैभव किशोर भिमाणी
४	नवघर १/२	VN04/21722	जितेश शशिकांत शेठ	प्रदिप रामजीभाय बावीशी
५	दिवाणमान ६/१	VN28/14167	एम रामामुर्ती	कुशेश्वर बहादूर ठाकूर
६	चुळणा	VN02/55363	मुकेश एन. वैष्णव व इतर १	अलीअसगर एस. गोलवाला व इतर १
७	नवघर ३	VN08/28917	प्रभावती सुरेंद्र शेट्टी	सुजाता शेट्टी
८	नवघर १/२	VN04/24228	आनंदसिंह उदयसिंह रावत	दिनेश आनंद रावत
९	नवघर १/३	VN05/24493	कार्लोस सेलेस्टो डिसोजा	आकाशदीप व सोनी पाल
१०	दिवाणमान २	VN23/61990/10	संजय रमेशभाई शेलडीया व इतर १	संजय रमेशभाई शेलडीया व उषा संजय शेलडीया
११	माणिकपूर २/१	VN19/34669	सांतान डॉमणिक लोपीस	शैला गॅब्रीयल लोपीस
१२	नवघर १/३	VN05/49679	फ्रान्सिस टी. रॉड्रीग्स व इतर १	शैला राजेंद्र सावंत
१३	ब-हामपूर	VN14/46355	राजेश एल्लप्पा अंचन	मारिया मायकल डीअलमेडा व मेरव्यान डीअलमेडा
१४	चुळणा	VN02/56186	क्रिस्टी जॉन्सन	मेरी लीन्सी रंगीत
१५	नवघर ४/२	VN10/1595	रेखा कमलेश देवलिया	करण कमलेश देवलिया
१६	दिवाणमान ४	VN25/8029	सेथु एम नारायण व शांता माधवन	रंजिता भजन महालिक व सुकांती भजनकुमार महालिक
१७	ब-हामपूर	VN14/50051	थॉमस एन सॅम्युएल	सुजन मरियम्मा मॅथ्यू
१८	दिवाणमान ६/२	VN29/55013	रेश्मा राज मेनन	सुष्मा राजन मेनन
१९	दिवाणमान ४	VN25/54258	चंद्रकांत शेणॉय व मंजुशा शेणॉय	सोनल गोपाळ पुजारी
२०	नवघर १/३	VN05/23159	अनिलभाई अशोकभाई अंबारीया व इतर १	बाबुलाल पोमाराम चौधरी

(जोसेफ मिनेजीस)
कर अधिक्षक
प्रभाग समिती 'एच'
वसई विरार शहर महानगरपालिका

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ ते १६ फेब्रुवारी २०२६

संपादकीय



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

चोरीचा मामला



भारतीय दंड संहितेच्या कलम ३७८ नुसार चोरी म्हणजेच, वस्तू पळविण्याचा एक गंभीर गुन्हा आहे. एखाद्याच्या संमतीशिवाय त्याची वस्तू किंवा जंगम मालमत्ता गैरमागार्ने काढून घेण्याची केलेली कृती हे चोरीच्या गुन्ह्यांचे स्वरूप मानले जाते. चोरीसाठी ३ वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा असल्याने आजही समाजात चोरीच्या गुन्ह्यांतील आरोपीपासून सावध राहण्याचा सल्ला दिला जातो. इंटरनेटच्या जमान्यात आता चोरीच्या व्याख्येत थोडी भर पडली आहे ती, माहिती चोराची! माहिती चोरीचे गुन्हे संबंधित कंपन्या करत असतील, तर लोकांनी विश्वास कोणावर ठेवायचा? एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान ह्यडेटा शेअरिंगह्णच्या नांवाखाली वापरकर्त्यांच्या गोपनीयतेचे उल्लंघन करण्यावरून व्हॉट्स□प आणि मेटा या कंपनीला सर्वोच्च न्यायालयाने कडक शब्दांत फटकारल्याने माहिती चोरीच्या गुन्ह्याकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष गेले आहे. नागरिकांच्या मूलभूत गोपनीयतेच्या अधिकाराशी खेळू नका, असा सज्जड दम न्यायालयाने दिला. असे गुन्हे पुन्हा घडणार नाही अशी लेखी हमी संबंधित कंपनीने द्यावी,असे निर्देशही खंडपीठाने दिले. अलीकडच्या काळात एआयच्या माध्यमातून आणखी एक माहिती चोरीचा प्रकार उजेडात आला होता. जगभरात एआयचा वापर जसा झपाट्याने वाढतो आहे, तसे त्यातील धोकेही समोर येत आहेत. त्यामुळे एलन मस्क यांच्या एआय कंपनीचा चॅटबॉट ग्रोक वादात सापडला होता. यापूर्वी ग्रोक एआयने काही यूजर्ससोबत चुकीची भाषा वापरल्याच्या तक्रारी आल्यानंतर मस्क यांनी माफी मागितली होती. आता हा चॅटबॉट सामान्य लोकांच्या घराचे पत्ते, संपर्क क्रमांक आणि कुटुंबांची माहिती शेअर करत असल्याचे उघड झाले आहे. कोणत्याही व्यक्तीचा त्याच्या संमतीशिवाय डेटा सहज उपलब्ध केला जात असेल तर, ते अतिशय गंभीर आहे. त्यातून यूजर्ससोबत अनेक गैरव्यवहार झाल्याचे प्रकार होत असल्याचे उघडकीस येत आहे.

सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणात नेमके काय झाले. मेटा आणि व्हॉट्सॲपवर त्यांच्या गोपनीयता धोरणांसाठी अपिलीय न्यायाधिकरणाने २०२१ मध्ये ठोठावलेला २१३ कोटी रुपयांचा दंड सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवत या कंपन्यांची कानउघडणी केली. ह्यडेटा शेअरिंगच्या नावाखाली तुम्ही लोकांच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन करू शकत नाही. जर तुम्ही नियम आणि कायदे पाळू शकत नसाल, तर देश सोडून जाह्ण अशा शब्दांत न्यायालयाने ताशेरे ओढले. सर्वसामान्यांच्या आयुष्याशी खेळणा□या कंपन्यांना वठणीवर आणण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने केलेला प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद आहे. व्हॉट्सॲपच्या डेटा शेअरिंगच्या अटींवर न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. गोपनीयतेच्या अटी इतक्या हुशारीने तयार केल्या आहेत की, सामान्य माणसाला त्या समजू शकत नाहीत. लोकांची वैयक्तिक माहिती चोरण्याचा हा चांगला मार्ग कंपन्यांनी शोधला असला तरी न्यायालय हे होऊ देणार नाही, असे मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठाने बजावले. सामान्य वापरकर्त्यांना समजणार नाही, असे क्लिष्ट गोपनीयता धोरण तयार करून कंपन्या माहिती गोळा करतात .ह्लडेटा शेअरिंगह्ल हा खासगी माहितीची चोरी करण्याचा एक मार्ग आहे. डिजिटल युगात हे प्रकरण वापरकर्त्यांचा डेटा किती असुरक्षित आहे, हे दर्शवते याकडे न्यायालयाने लक्ष वेधले. व्यक्तीच्या वैयक्तिक माहितीबरोबरच उद्योगधंद्यासाठी ह्यडेटाह्ल ही सर्वात मौल्यवान संपत्तींपैकी एक आहे. म्हणून, तो चोरण्याचे प्रकार सर्रास होऊ लागले आहेत. डेटा चोरी म्हणजे काय ? तर, डिजिटल स्वरूपात संग्रहित केलेली संवेदनशील माहिती अनधिकृतपणे मिळवणे, कॉपी करणे किंवा बाहेर काढणे. ती मिळविण्यासाठी, अपप्रवृत्तीच्या व्यक्ती त्यांच्याकडे असलेल्या विशेषाधिकारांचा गैरवापर करतात किंवा संगणक प्रणाली, नेटवर्क किंवा डिजिटल स्टोरेज उपकरणांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी इतर मार्गांचा वापर करतात, हे सर्वोच्च न्यायालयातील ताज्या प्रकरणावरून पुन्हा एकदा जनतेच्या लक्षात आले आहे.

पूर्वी मुलाला समजायला-उमजायला लागल्यानंतर सातव्या वर्षी शाळेत प्रवेश दिला जात असे. आताची पिढीही प्रगत पाहायला मिळते. मोबाइल फोन हाताळणे हा तीन वर्षांच्या मुलाला नुसते जमत नाही, तर सोशल मिडीयावरील अनेक ॲपची नावेही त्याला ठाऊक आहेत. नोकरी धंद्यांच्या ठिकाणी व्हॉट्सॲपचा वापर सर्रास केला जातो. सोशल मीडियाशी संबंध नसलेली व्यक्ती म्हणजे तिला जगाशी त्याचे देणेघेणे नाही असा समज करून दिला जातो. सोशल मीडिया, मोबाइल, इंटरनेट हे शब्द आपल्या आयुष्याशी अभिन्न जोडले गेले आहेत. त्यामुळे या सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली वैयक्तिक गोपनीय माहितीही जर चोरी होत असेल, तर विश्वास कोणावर ठेवायचा ? असा प्रश्न प्रत्येकांच्या मनात येऊ शकतो. चोरी केलेला डेटा, बँक खात्याची माहिती, ऑनलाइन पासवर्ड, पासपोर्ट क्रमांक, ड्रायव्हिंग लायसन क्रमांक, सामाजिक सुरक्षा क्रमांक, ऑनलाइन सदस्यता इत्यादींपैकी काहीही असू शकतो. जर एखाद्या अनधिकृत व्यक्तीला वैयक्तिक किंवा आर्थिक माहितीमध्ये प्रवेश मिळाला, की मालकाच्या परवानगीशिवाय ती हटवू शकतात, बदलू शकतात, याला ह्यमाहिती चोरीह्ल असे आपण म्हणतो. ग्राहकांच्या नोंदीतून चोरीचे प्रकार घडू शकतात. क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्ड माहितीसारखा आर्थिक डेटा, सोर्स कोड, मालकी प्रक्रियेचे वर्णन आणि ऑपरेटिंग पद्धती, एचआर रेकॉर्ड आणि कर्मचारी डेटा, संगणकावर साठवलेल्या खासगी कागदपत्रांचा वापर केला जाऊ शकतो. जेव्हा संवेदनशील डेटा चुकून इंटरनेटवर किंवा हरवलेल्या हार्ड ड्राइव्ह किंवा उपकरणांद्वारे उघड होतो तेव्हा डेटा लीक होतो. यामुळे सायबर गुन्हेगारांना त्यांच्याकडून कोणत्याही प्रयत्नांशिवाय संवेदनशील डेटावर अनधिकृत प्रवेश मिळतो. एखाद्या व्यक्तीने किंवा संस्थेने साठवलेली कोणतीही माहिती डेटा चोरांसाठी संभाव्य लक्ष्य असू शकते. यापुढे ॲपच्या कंपन्यांनी पापाचे वाटेकरी होऊ नये, एवढीच अपेक्षा सर्वसामान्य वापरकर्ता करतो आहेत.

बंदरांच्या आधुनिकीकरणातून अर्थशक्तीचा उदय

भारताचा सुमारे ९५ टक्के व्यापार समुद्रमार्गे होतो. समुद्र हा भारताच्या व्यापाराचा जीवनमार्ग आहे. कच्चे तेल आणि कोळशापासून इलेक्ट्रॉनिक्स, कापड आणि कृषी उत्पादनांपर्यंत देशाच्या आयात आणि निर्यातींचा मोठा भाग व्यस्त बंदरांमधून जातो. जागतिकीकरणामुळे पुरवठा साखळ्यांमध्ये खोलवर परस्परावलंबन निर्माण झाले असून भारत एक प्रमुख उत्पादन आणि ऊर्जा केंद्र म्हणून उदयास आला आहे. जागतिक सागरी शक्ती म्हणून स्वतःला स्थापित करण्याच्या उद्देशाने एक धाडसी पाऊल उचलून भारताने ह्यमेरिटाईम इंडिया व्हिजन २०३०ह्ल (एआयव्ही) लाँच केले. २०२१ मध्ये सुरू झालेल्या या परिवर्तनकारी रोडमॅपमध्ये १५० हून अधिक धोरणात्मक उपक्रमांचा समावेश आहे. बंदरांचे आधुनिकीकरण, शिपिंग क्षमता वाढवणे आणि क्षमता आणि कौशल्य विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून अंतर्गत जलमार्गांना बळकट करणे हे या दृष्टिकोनाचे उद्दिष्ट आहे. केवळ मालवाहतुकीचा आराखडा न राहता ह्यएमआयव्ही २०२०ह्ल हे व्यापार, गुंतवणूक आणि रोजगारासाठी एक उत्प्रेरक आहे. यामुळे भारताच्या आर्थिक विकासाचा आणि जागतिक स्पर्धात्मकतेचा मार्ग मोकळा होतो. भारताचे सागरी क्षेत्र वेगाने वाढत आहे. बंदरे, किनारी नौवहन आणि अंतर्गत जलमार्गांमध्ये विक्रमी कामगिरी भारताला आर्थिक विकासाच्या नवीन मार्गावर पुढे नेत आहे. या क्षेत्राची प्रगती राष्ट्राला बळकट करण्यात त्याची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करते. भारताच्या बंदर क्षेत्राने प्रचंड परिवर्तनकारी झेप घेतली आहे. बंदरांची एकूण क्षमता १४० कोटी टनांवरून २७६.२ कोटी टन झाली आहे. क्षमतेतील ही वाढ आधुनिकीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विकासात होणा□या मोठ्या गुंतवणुकीचे प्रतिबिंब आहे. मालवाहतुकीचे प्रमाणदेखील प्रभावीपणे वाढले, ९७.२ दशलक्ष टनांवरून १५९.४ दशलक्ष टन मालवाहतूक झाली. यावरून सागरी व्यापारात आणि बंदरांच्या कार्यक्षमतेत प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते. २०२४-२५ मध्ये प्रमुख बंदरांमधून ८५.५ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली.

२०२३-२४ मध्ये या बंदरांमधून ८१.९ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली होती. कामकाजात लक्षणीय सुधारणा झाल्यामुळे जलवाहतुकीचा सरासरी वेळ ९३ तासांवरून फक्त ४८ तासांवर आला आहे. यामुळे एकूण उत्पादकता आणि जागतिक स्पर्धात्मकता आणि या क्षेत्राची आर्थिक ताकददेखील वाढली आहे. या क्षेत्राचा निव्वळ वार्षिक अधिशेष १,०२६ कोटी रुपयांवरून ९,३५२ कोटी रुपयांपर्यंत झपाट्याने वाढला आहे. तो महसूल निर्मिती आणि खर्च व्यवस्थापनात सुधारणा दर्शवतो. ऑपरेटिंग रेशो ७३ टक्क्यांवरून ४३ टक्क्यांपर्यंत सुधारणे हे संवहनी आणि फायदेशीर बंदर ऑपरेशन्सच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. भारताचे शिपिंग क्षेत्र सातत्याने विकसित होत आहे. भारतीय ध्वजांकित जलवाहतुकीची संख्या १,२०५ वरून १,५४९ पर्यंत वाढली आहे. ती देशाच्या व्यापक सागरी उपस्थितीचे संकेत देते. भारतीय ताफ्याचे एकूण टनेजदेखील दहा दशलक्ष ग्रॉस टनांनी वाढून १.३५ कोटी ग्रॉस टन झाले आहे. त्यांची शिपिंग क्षमता अधिक मजबूत आणि अधिक सक्षम होण्याची अपेक्षा आहे. किनारी शिपिंगमध्येही लक्षणीय गती दिसून आली आहे. मालवाहतूक ८.७० दशलक्ष टनांवरून १६.५० दशलक्ष टन झाली आहे. यामुळे कार्यक्षम, परवडणा□या आणि पर्यावरणपूरक वाहतुकीच्या पद्धतींकडे कल वाढतो. भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरणाने (आयडब्ल्यूएआय) म्हटले आहे, की ते १४.६० दशलक्ष टन मालाची विक्रमी वाहतूक करेल. ही आंतरदेशीय जलवाहतूक क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक घटना आहे. २०१४ च्या १.८० दशलक्ष टनाच्या तुलनेत ही वाढ ७१० टक्के आहे. ह्यआयडब्ल्यूएआयह्लने ह्यहल्दिया मल्टीमोडल टर्मिनलह्ल (एमएमटी) आयआरसी नॅचरल रिसोर्सेसकडे सोपवले आहे.

सरकार आणि खासगी क्षेत्राच्या भागीदारीमध्ये अंतर्गत जलमार्ग पायाभूत सुविधांचे अपग्रेडिंग आणि बहुमॉडेल वाहतुकीला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. जागतिक बँकेच्या मदतीने बांधलेल्या पश्चिम बंगालमधील टर्मिनलची क्षमता ०.३० दशलक्ष टन आहे. प्रवासी जलवाहतूक आणि रोप-पॅक (वाहने आणि वाहने वाहून नेणारी जहाजे) ची लोकप्रियतादेखील बरीच वाढली आहे. २०२४-२५ मध्ये ७.५ कोटींहून अधिक वाहने त्यातून प्रवास करतील. यावरून दिसून येते, की लोक सुरक्षित आणि कार्यक्षम प्रवासासाठी जलद गतीने जलआधारित वाहतुकीचा अवलंब करत आहेत. २०३० मध्ये बंदरे, जहाजबांधणी आणि अंतर्गत जलमार्गांमध्ये एकूण ३-३.५ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची योजना आहे. जहाजबांधणीला चालना देण्यासाठी आणि सागरी परिसंस्थांना पुनरुज्जीवित करण्यासाठी अलीकडेच जाहीर केलेल्या ६९ हजार ७२५ कोटी रुपयांच्या ऐतिहासिक पॅकेजसह इंडिया टू कॉन्टिनेंटल वर्ल्डवाइड त्याच्या विशाल किना□याचा वापर करून स्थापनेसाठी एक धोरणात्मक मार्ग तयार करत आहे. लक्ष्यित वाटप आणि धोरणात्मक उपक्रम एकूण दृष्टिकोनाशी सहज जोडलेले आहेत. त्यामुळे प्रस्तावित गुंतवणूक यशस्वी होते. प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. सागरी विकास निधी (एमडीएफ) भारताच्या नेव्हिगेशनल क्षमता आणि जहाजबांधणी क्षमतेच्या विस्तारासाठी दीर्घकालीन वित्तपुरवठा करेल. याव्यतिरिक्त, २४ हजार ७३६ कोटी रुपयांच्या खर्चासह सुधारित जहाज बांधणी वित्तीय सहाय्य योजना (एसबीएफएएस) देशांतर्गत खचार्शी संबंधित तोटे दूर करेल. १९,९८९ कोटी रुपयांच्या खर्चासह, जहाज बांधणी विकास योजना (एसबीडीएस) ग्रीनफील्ड क्लस्टर्स, यार्डचा विस्तार आणि जोखीम कव्हरेजला प्रोत्साहन देते. याव्यतिरिक्त, विशाखापट्टणममध्ये ३०५ कोटी रुपये खर्चून बांधलेले ह्यइंडियन शिप टेक्नॉलॉजी सेंटरह्ल (आयएसटीसी) हे जहाज डिझाइन, संशोधन आणि विकास, अभियांत्रिकी आणि कौशल्य विकासाचे राष्ट्रीय केंद्र आहे.

ईशान्य भारतातील अंतर्देशीय जलमार्ग पायाभूत सुविधांच्या विकासात एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करण्यात आली आहे, जी देशाच्या नदी नेटवर्कद्वारे वाहतूक आणि व्यापाराला महत्त्वपूर्ण चालना देते. या गुंतवणुकीपैकी सुमारे तीनशे कोटी रुपयांचे प्रकल्प आधीच पूर्ण झाले आहेत तर उर्वरित प्रकल्प अद्याप पूर्ण झालेले नाहीत. त्यात कनेक्टिव्हिटी आणि प्रादेशिक व्यापार वाढवणे समाविष्ट आहे. या प्रदेशात मोठ्या प्रमाणात पर्यटन सुरू करण्याची तयारी सुरू आहे. हावडा येथील हुगळी कोचीन शिपयार्डमध्ये २५० कोटी रुपयांच्या एकत्रित गुंतवणुकीसह दोन लक्झरी क्रूझ जहाजे बांधली जात आहेत. हे जहाज ब्रह्मपुत्रा नदीतून प्रवास करेल. सरकारच्या ह्यक्रूझ इंडिया मिशनह्लअंतर्गत आसामच्या नदी पर्यटनाच्या लँडस्केपमध्ये ते बदल घडवून आणील, अशी अपेक्षा आहे. भारताला ह्यसागरमाला प्रकल्पह्ल हा ह्यसमुद्री भारत व्हिजन २०३०ह्ल आणि ह्यसमुद्री अमृत कल व्हिजनह्लचा एक प्रमुख आधारस्तंभ आहे. हा कार्यक्रम लॉजिस्टिक्स खर्च कमी करणे, व्यापार कार्यक्षमता वाढवणे आणि हरित वाहतूक नेटवर्कद्वारे रोजगार निर्माण करणे यावर केंद्रित आहे. याअंतर्गत, २०३५ पर्यंत ५.८ लाख कोटी रुपयांचे ८४० प्रकल्प राबवले जातील. त्यापैकी १.४१ लाख कोटी रुपयांचे २७२ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. भारताचे सागरी क्षेत्र एका निर्णायक दशकात प्रवेश करत आहे. तिथे नवीन कायदे, मोठे प्रकल्प आणि जागतिक गुंतवणूक महत्त्वाकांक्षा ह्यसागरी भारत व्हिजन, २०३०ह्ल ला आकार देत आहेत. हरित तंत्रज्ञान आणि डिजिटल नवोपक्रमावर भर देऊन भारत केवळ त्याच्या व्यावसायिक मागण्या पूर्ण करण्यासाठीच नाही, तर सागरी क्षेत्रात एक नेता म्हणून उदयाला येण्यासाठीही सज्ज होत आहे. हे लक्षात घेऊन ह्यसागरी अमृतकाल व्हिजन, २०४७ह्ल तयार केले जात आहे. तो भारताच्या सागरी पुनरुत्थानाचा दीर्घकालीन रोडमॅप आहे. त्यात बंदरे, किनारी नौहरगोहन निर्माण यांचा समावेश आहे. ह्यहरित नेव्हिगेशनह्ल उपक्रमांसाठी सुमारे ८० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राखून ठेवण्यात आली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)

मुख्य कार्यालय विरार

दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./५५/२५-२६

दिनांक :- ०२/०२/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्रमांक.	रिसीट नं	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव	खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	गास - ०५	NL०५/३२३४/१	१८९०७	तलहा राशीद चिंदे	सरताज शाहरुख खान
२	गास - ०५	NL०५/२०२	२०८७८	मुनिरा इब्राहीम बुकवाला	ईरशाद अहमद शेख
३	गास - ०५	NL०५/३०३२/४४	१७५७१	सुफिया रज्जब अली शेख	सोरठिया नजमा आलम
४	गास - ०५	NL०५/३८२/१४	१७५७२	बाळू लक्ष्मण बावळेकर	संजीवनी संजय पवार
५	गास - ०५	NL०५/२१५१	१४६७७	परवीन सलमान खान	जाहिदा परवेज खान
६	गास - ०५	NL०५/३२२४/३०	१९७४३	दीपक मंडल	मेहरुन्निसा मो. रफिक शेख व मो. रफिक शेख
७	गास - ०५	NL०५/३२२४/३१	१९७४४	दीपक मंडल	मेहरुन्निसा मो. रफिक शेख व मो. रफिक शेख
८	गास - ०५	NL०५/३२२४/८२	१७७३९	दीपक मंडल	फातिमा नूर मोहम्मद शाह
९	गास - ०५	NL०५/३१५६/३३	१७७४९	मोहम्मद मोईन अशरफ	शाईस्ता मोईन अशरफ शेख
१०	गास - ०५	NL०५/२५०९	१७३९०	बदरुन्निसा अली हुसेन शेख	अली हुसेन हाजीर शेख
११	गास - ०५	NL०५/३२०७/२३	१४९९१	मेहबूब अली अन्सारी फुरकान अन्सारी	इमरान रसूल शेख
१२	गास - ०५	NL०५/३०३४/१७	१४८३९	इस्तियाक अली	अमित काशिनाथ मोंडल व रुना अमित मोंडल
१३	गास - ०५	NL०५/३०१७/४१	१९२३८	मोहम्मद उमर खान	दारुयया राणी वाजीद अली सय्यद व नुरे ऐरस वाजीद अली सय्यद
१४	गास - ०४	NL०४/२११	१९१८३	डॉ. राम श्रीकांत कुलकर्णी व ॲड शाम कुलकर्णी	ॲड शाम श्रीकांत कुलकर्णी
१५	गास - ०५	NL०५/३१५९/१५	१५६९०	इंद्रदेव शाहू शंकर कुमार शाहू	सुधीर वेदमणी साहू
१६	गास - ०५	NL०५/६६७	१५६८९	रुबिनाबानो अब्दूल रशीद अन्सारी	अफसाना खान
१७	गास - ०५	NL०५/३१७९/१२	१५६९१	मोहम्मद आरिफ खान	दिपक गुरुचरण चव्हाण
१८	गास - ०५	NL०५/१११५	१६६३६	नविद महम्मद हुसेन चिंदे	रियाज नुरुल हसन शेख व मूबीन रियाज शेख
१९	गास - ०५	NL०५/२२५८	१८९९२	तुषार हरिश्चंद्र दिवेकर	नुसरत जहा
२०	गास - ०५	NL०५/३१२०	१८४६६	असिफ हसन भाटकर	मुख्तार अंसारी

XXX

(निता कोरे)

सहायक आयुक्त

प्रभाग समिती (ई) नालासोपारा

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ ते १६ फेब्रुवारी २०२६

लाडकी बहीण योजनेत मोठा घोटाळा

सरकारी यंत्रणा हादरली

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

मुंबई। राज्य सरकारची अत्यंत लोकप्रिय आणि महत्त्वाकांक्षी असलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सध्या एका वेगळ्या कारणाने चर्चेत आहे. नंदुरबार जिल्ह्यात एका धक्कादायक प्रकारामुळे चर्चेत आली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना सक्षम करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या या योजनेचा लाभ काही पुरुषांनी लाटल्याचे उघड झाले आहे. नंदूरबार जिल्ह्यातील तब्बल ७१० पुरुषांनी या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर केले होते. मात्र जिल्हा प्रशासनाच्या सतर्कतेमुळे हा अजब आणि गंभीर गैरप्रकार वेळेत उघडकीस आला आहे.

नेमका प्रकार काय?

नंदुरबार जिल्हा महिला व बालकल्याण विभागामार्फत सध्या प्राप्त अर्जाची युद्धपातळीवर छाननी प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेदरम्यान आधार कार्ड, बँक तपशील आणि लिंग यांची पडताळणी करत असताना अधिकाऱ्यांना काही अर्जांमध्ये संशयास्पद बाबी आढळल्या. अर्जाची अधिक सखोल चौकशी करण्यात आली. यावेळी महिलांसाठीच्या या योजनेत चक्क ७१० पुरुषांनी आपले अर्ज दाखल केल्याचे स्पष्ट झाले. या पुरुषांनी केवळ अर्जच भरले नाहीत, तर त्यासोबत आवश्यक कागदपत्रे जोडून योजनेचा हप्ता मिळवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

हा प्रकार निदर्शनास येताच जिल्हा प्रशासनाने तातडीने सूत्रे हलवत खालील पावले उचलली आहेत. महिला व बालकल्याण विभागाने हे सर्व ७१० पुरुष अर्जदारांचे अर्ज तातडीने अपात्र ठरवून पोर्टलवरून बाद केले आहेत. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, हा प्रकार प्राथमिक छाननीच्या स्तरावरच पकडला गेल्यामुळे एकाही पुरुष अर्जदाराच्या खात्यात योजनेचे पैसे जमा झालेले नाहीत. यामुळे सरकारी निधीचा होणारा गैरवापर टळला आहे. या प्रकारानंतर प्रशासनाने अधिक कडक पावले उचलली आहेत. प्रत्येक अजार्ची आणि त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांची आता सूक्ष्म पातळीवर तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत.

अर्जदारांवर कायदेशीर कारवाई होणार?

केवळ महिलांसाठी राखीव असलेल्या योजनेत खोटी माहिती देऊन किंवा लिंग लपवून अर्ज सादर करणे हा एक प्रकारे शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न मानला जात आहे. या योजनेचा मूळ उद्देश गरजू महिलांना आधार देणे आहे. मात्र अशा कृत्यांमुळे शासकीय यंत्रणेवर विनाकारण ताण येतो, असे मत प्रशासकीय सूत्रांनी व्यक्त केले आहे. आता या ७१० पुरुष अर्जदारांवर फौजदारी गुन्हे दाखल होणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. या प्रकारामुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. तसेच योजनेच्या पारदर्शकतेवर पुन्हा एकदा चर्चा सुरु झाली आहे.

भुईगाव समुद्रकिनाऱ्यावरील सुरुची झाडे कोसळली...

किनारपट्टी धूपेमुळे निसर्गसौंदर्य धोक्यात



वसई। वसई तालुक्यातील भुईगाव समुद्रकिनाऱ्यावरील दाट सुरुच्या झाडांची बाग सध्या गंभीर संकटात सापडली आहे. समुद्राच्या वाढत्या धूपेमुळे आणि भरतीच्या पाण्यामुळे येथील शेकडो सुरुची झाडे कोसळलेली असून, अनेक झाडे मुळासकट उन्मळून पडलेली दिसत आहेत. निसर्गरम्य वातावरणासाठी आणि शांत पर्यटनस्थळ म्हणून ओळख असलेला भुईगाव समुद्रकिनारा धोक्यात असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. सुमारे २५ वर्षांपूर्वी शासन आणि स्थानिक ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून भुईगाव समुद्रकिनारी १२ हजारांहून अधिक सुरुच्या झाडांची लागवड करण्यात आली होती. या झाडांमुळे किनाऱ्याची धूप रोखण्यास मदत होत होती तसेच समुद्रकिनाऱ्याच्या सौंदर्यातही भर पडत होती. प्री-वेडिंग फोटोशूट, सहली आणि पक्षीनिरीक्षणासाठी हे ठिकाण पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरले होते. मात्र मागील दोन ते तीन वर्षांपासून परिस्थिती झपाट्याने बदलू लागली आहे. सतत वाढणारी समुद्राची भरती, अतिवृष्टी आणि किनारपट्टी भागात वाढलेले अतिक्रमण यामुळे समुद्राचे पाणी थेट सुरुच्या बागेत आणि शेतजमिनीत घुसत आहे. परिणामी आत्तापर्यंत सुमारे पाच हजारांहून अधिक सुरुची झाडे भरतीच्या पाण्याची शिकार झाली असल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि जोरदार भरतीमुळे मागील काही दिवसात शेकडो झाडांचा खच समुद्रकिनाऱ्यावर पडलेला पाहायला मिळत आहे.

या झाडांच्या पडझडीमुळे केवळ पर्यावरणीय नुकसान झालेले नसून किनाऱ्यालगतच्या शेतकऱ्यांनाही मोठा फटका बसत आहे. सुरुच्या बागेमुळे मिळणारा वाऱ्याचा अडथळा आणि जमिनीचे संरक्षण आता कमी झाले आहे. यामुळे भविष्यात शेती, वस्ती आणि रस्त्यांनाही धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

गेल्या तीन ते चार वर्षांपासून गावकरी, पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्ते भुईगाव समुद्रकिनारी मजबूत संरक्षक बंधारा बांधण्याची मागणी प्रशासनाकडे सातत्याने करत आहेत. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. हवामान बदलाचा परिणाम, वाढवण क्षेत्रात समुद्रात करण्यात आलेला सुमारे पाच हजार एकर क्षेत्रफळाचा आणि तीस फूट उंचीचा भराव यामुळे भुईगावसह रानगाव व अनाळा येथील किनारपट्टी समुद्रातही ही समस्या निर्माण होण्याचा धोका वाढला आहे. प्रशासनाने उपलब्ध निधीचा तातडीने वापर करून मजबूत संरक्षक बंधारा बांधावा आणि भुईगाव समुद्रकिनारा वाचवावा अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

रस्त्याअभावी १८ वर्षीय युवकाचा मृत्यू...

झोळी बांधून दवाखान्यात नेताना वाटेतच सोडला जीव



"विक्रमगड विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक गावात रस्ते व्हावेत याकरिता वन मंत्री तथा पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्याकडे निधी उपलब्ध करत रस्ते व्यवस्था बळकट व्हावी म्हणून मागणी केली आहे."
हरिश्चंद्र भोये, आमदार, विक्रमगड विधानसभा

जव्हार। तालुक्यातील तिलोंडा (आंबेपाडा) येथील रस्ताविहीनतेचा भीषण परिणाम पुन्हा एकदा समोर आला आहे. १८ वर्षीय शैलेश मगन वागदडा हा युवक गंभीर आजारी असताना वेळेवर उपचार न मिळाल्याने मंगळवारी पहाटे मृत्युमुखी पडला. रस्त्याच्या नामुष्कीने जव्हार तालुक्यात आणखी एक रुग्ण मृत्युमुखी पडला.

गावात जाण्यासाठी रस्ता नसल्याने गावकर्‍यांनी शैलेशला डोली बांधून दवाखान्याकडे नेण्याची वेळ आली. मात्र, उशीर झाल्याने त्याचा प्राण वाचू शकला नाही. तिलोंडा (आंबेपाडा) हे आदिवासीबहुल गाव आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. पावसाळ्यात तर या गावाचा संपर्क पूर्णतः तुटतो.ऽ रुग्णवाहिका किंवा चारचाकी वाहन गावात पोहोचू शकत नसल्याने आजारी रुग्णांना खडतर डोंगरवाटांवरून डोळीनेच हलवावे लागते. शैलेशच्या बाबतीतही हेच घडले. प्रकृती गंभीर असतानाही वेळेवर दवाखान्यात पोहोचणे शक्य न झाल्याने त्याचा दुदैर्वी मृत्यू झाला. या घटनेनंतर गावात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून रस्ता, आरोग्य सुविधा यासाठी मागणी करूनही ग्रामसेवक, सरपंच किंवा संबंधित विभागांकडून कोणताही ठोस पाठपुरावा झाला नाही, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली. प्रशासनाकडून केवळ आश्वासनांचीच खैरात झाली असून प्रत्यक्षात मात्र परिस्थिती जैसे थे असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

या घटनेने तालुक्यातील दुर्गम भागांतील आरोग्य व दळणवळण व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. एका युवकाचा बळी गेल्यानंतर तरी प्रशासन जागे होणार का, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. रस्त्यासह मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यात याव्यात, अन्यथा आंदोलनाचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

पाणवेलींनी व्यापले वसई विरारचे नाले



वसई। वसईतील सनसिटी परिसरात असलेल्या मुख्य नाल्यात मोठ्या प्रमाणात पाणवेल पसरल्याने नाल्याची गंभीर दुरवस्था झाली आहे. नाल्यातील पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्णपणे अडथळलेला असून पाणी साचल्यामुळे परिसरात अस्वच्छता आणि तीव्र दुगंर्धी पसरली आहे. या परिस्थितीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. वसई विरार शहरात अनेक मोठे नाले आहेत. मात्र यापैकी बहुतांश नाल्यांची नियमित स्वच्छता होत नसल्याने नागरिकांना अनेक अडचर्णींना सामोरे जावे लागत आहे. सनसिटी रोडवरील हा मुख्य नाला शहरातील दूषित पाणी वाहून नेतो. मात्र नाल्यात मोठ्या प्रमाणात पाणवेल साचल्याने संपूर्ण नाला हिरवळीने गच्च भरलेला दिसून येत आहे. पाणवेलीमुळे पाण्याचा प्रवाह बंद झाल्याने नाल्यात सांडपाणी साचून राहत असून त्यामुळे दुगंर्धी अधिक तीव्र झाली आहे.

या साचलेल्या दूषित पण्यामुळे परिसरात डास आणि विविध कीटकांचा प्रादुर्भाव वाढत आहे. परिणामी डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढल्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. विशेषतः लहान मुले, वृद्ध नागरिक आणि आजारी व्यक्तींना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता असून, वेळीच उपायोजना न केल्यास परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

नाल्यात साचलेल्या पाणवेलीमुळे नाल्याची रुंदी व खोली कमी झाली असून पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढला आहे. जोरदार पावसात नाला तुडुंब भरून पाणी रस्त्यावर येण्याची शक्यता आहे. आरोग्यविभागाकडून केवळ औषध फवारणी केली जात असली तरी नाल्याची नियमित स्वच्छता न झाल्यास ही उपाययोजना अपुरी ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. साचलेल्या दूषित पाण्यामुळे पर्यावरणीय संतुलन बिघडत असून जमिनीच्या पाण्यावरही त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

नाल्याच्या स्वच्छतेसाठी अनेकदा स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप केला जात आहे. नाल्यातील गाळ, कचरा आणि पाणवेल काढण्यासाठी यांत्रिक पद्धतीने स्वच्छता करणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, वसई विरार शहरात महापौरपदाची निवड झाल्याने प्रशासकीय राजवटीचा कालावधी संपुष्टात आला आहे. आता शहरातील सर्व विकासकामे महापौरपदांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहेत. त्यामुळे नाल्यांच्या स्वच्छतेसह शहरातील स्वच्छता, आरोग्य आणि पायाभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांवर तातडीने लक्ष दिले जाईल, तसेच प्रशासन अधिक जबाबदारीने काम करेल अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

मुख्य कार्यालय - विरार

दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३

जावक क्र. ववि‌शम /कर/१६६/२०२५-२६

दिनांक - ०४/०२/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरण परत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भात कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय विभागीय कार्यालय विरार येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यतः करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	मालमत्ता क्र.	पावती क्र.	ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन नाव
1	NL02/988/61	ASS/22589	ईझहर अली वाशिद अली शेख	फरजांना शेख
2	NL01/6/27	ASS/22683	मनोज तुकाराम मेश्राम	नीतू विनय बीडये
3	NL01/117/86	ASS/10503	ओसवाल नगरी	कैलाश ओमप्रकाश शुक्ला
4	NL01/135/39	ASS/22669	दिलीप अर्जुन चव्हाण	चिन्मय जयदेव दास
5	NL01/189/6	ASS/22671	नरेश कुमार दौलतराम जैन / जयंतीलाल दौलतराम जैन / अरविदंकुमार सोहनलाल जैन	दिपक प्रदीप पांडेय
6	NL02/677/19	ASS/22670	रिया रविंद्र तिर्लोटकर	संगीता प्रवीन सोनी
7	NL04/381/36	ASS/22672	सिताराम मंगलाराम कुम्हार	दिपीका बैशर दळवी / बैशर श्रीपत दळवी
8	NL01/119/11	ASS/22743	हेमनाथ लाड / प्रतिक्षा हेमनाथ लाड	राज धर्मेंद्र वाकोडे / धर्मेंद्र पद्माकर वाकोडे
9	NL01/213/17	ASS/21829	लक्ष्मण एच. नागांवकर	जयश्री लक्ष्मीधर घमरे
10	NL07/494/10	ASS/22723	विनोद प्रेमजी सापरिया	नंदू विनोद सापरिया
11	NL07/542/54	ASS/22719	जयेश रवि शेट्टी / योगेश रवि शेट्टी	प्रविण विश्वनाथ कोकोटे / अंगारिका प्रविण कोकाटे
12	NL07/37/3	ASS/22720	प्रमोद संभाजी चव्हाण	अभिलाषा अभिजीत खिरबीरे / अभिजीत सुरेश खिरबीरे
13	NL02/747/14	ASS/22740	अकील अहमद जसीमुल्लाह	कफिल अहमद सिध्दिकी
14	NL02/747/15	ASS/22739	अकील अहमद जसीमुल्लाह	जसीम अहमद सिध्दिकी
15	NL01/260/136	ASS/22725	शोभा जाधव	मानसी पार्थ बारोट
16	NL02/20/30	ASS/22732	उदय जयराम साळुंखे	पंकज कृष्णा सावंत
17	NL07/455/48	ASS/24052	आर्या एकनाथ राऊत / एकनाथ वसंत राऊत	स्वाती गोपाळ जाधव
18	NL07/507/48	ASS/24055	दिलीप रामभाऊ भद्रिके	निलेश दिलीप वीर / प्राची निलेश वीर
19	NL05/8/17	ASS/24054	प्रकाश जयसिंग पाटोळे	शरयू सुभाष करडे
20	NL07/345/20	ASS/27053	प्रतिभा प्रकाश पंदीरकर	हकाराम उदाराम पटेल

सही /-

सहा. आयुक्त

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

वसई-विरार शहर महानगरपालिका

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com